# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### परीक्षा विभाग

**लोकमत**

# कौशल्याभिमुख शिक्षणाची आवश्यकता : गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क



**प्राणिशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करताना डॉ. व्ही. बी. गायकवाड, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील व मान्यवर.**

**राजगुरुनगर :** अनेक शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजिण्यात आलेल्या तृतीय पदवीग्रहण समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी. सी. एस., बी. सी. ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. याकरिता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात, असे ते म्हणाले.

Hello Pune Gramin
Page No. 2 Mar 11, 2018
Powered by: erelego.com

जनशक्ति

7/12

# तंत्रज्ञान व कौशल्याभिमुख शिक्षणाची आवश्यकता : डॉ. गायकवाड

## हुतात्मा राजगुरूचा पदवीदान समारंभ

। राजगुरुनगर ✍ प्रतिनिधी।

**अनेक** शिक्षणसंस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तृतीय पदवीदान समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील होते.यप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी. एस., बी.सी.ए. या शाखांतील पदवीदान करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीता डोंगरे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी तर आभार उपप्राचार्य व परीक्षाधिकारी प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी मानले.



### विद्यार्थ्यांनी नव्या वाटा शोधाव्यात

» **गायकवाड** म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौध्दिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजे. यासाठी शिक्षणसंस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावताना विद्यार्थी ग्राहक मानून त्याला सर्वोत्तम गुणवत्ताधारित शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबध्दपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. या करीता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच दर्जेदार संगणकीय शिक्षण, एखादी परदेशी भाषा, ॲनिमेशन, ट्रॅव्हल टुरिझमसारखे शिक्षण घेतले तरच विद्यार्थांना यशस्वी होण्याची संधी आहे, असे ते म्हणाले. विद्यापीठ अनुदान आयोग व इतर विद्यापीठांच्या वेबसाइटला भेट देऊन नेमकेपणाने संधीचा शोध घ्या. प्रयत्नवादी राहा असे आवाहन त्यांनी विद्यार्थांना केले. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संस्थेच्या वतीने कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देण्यात येणार असून पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विभागाच्या वतीने कौशल्याधारित अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना चार भिंतींच्या पलिकडचे शिक्षण मिळावे यासाठी कार्यानुभवावर आधारित क्षेत्रीय भेटींना प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

# जगाबरोबर चालणाऱ्या शिक्षणाची गरज : डॉ. व्ही. बी. गायकवाड

राजगुरुनगर । वार्ताहर

अनेक शिक्षणसंस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तृतीय पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, प्रा.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला,



वाणिज्य, विज्ञान, बी.सी.एस., बी.सी.ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते. डॉ.गायकवाड बोलताना पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजे. यासाठी शिक्षणसंस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावताना विद्यार्थी ग्राहक मानून त्याला सर्वोत्तम गुणवत्ताधारित शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. या करीता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच दर्जेदार संगणकीय शिक्षण, एखादी परदेशी भाषा, ॲनिमेशन, ट्रॅव्हल टुरिझमसारखे शिक्षण घेतले तरच विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याची संधी आहे, असेही ते म्हणाले.

विद्यापीठ अनुदान आयोग व इतर विद्यापीठांच्या वेबसाइटला भेट देऊन नेमकेपणाने संधीचा शोध घ्या. प्रयत्नवादी रहा असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संस्थेच्या वतीने कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देण्यात येणार असून पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विभागाच्या वतीने कौशल्याधारित अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना चार भिंतींच्या पलिकडचे शिक्षण मिळावे यासाठी कार्यानुभवावर आधारित क्षेत्रीय भेटींना प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी हर्षद चाळेकर याचा महाराष्ट्र शासनाचा वेटलिफ्टिंगमध्ये सर्वोत्तम खेळाडू म्हणून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

लोकमत पुणे, रविवार, दि. ११ मार्च २०१८ २

# कौशल्याभिमुख शिक्षणाची आवश्यकता : गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क



प्राणिशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करताना डॉ. व्ही. बी. गायकवाड, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील व मान्यवर.

राजगुरुनगर : अनेक शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तृतीय पदवीग्रहण समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

यावेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. बी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी. सी. एस., बी. सी. ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. याकरिता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात, असे ते म्हणाले.

प्रभात पुणे, शनिवार, दि. १० मार्च २०१८ 05

# उद्योगाची गरज ओळखून कौशल्याभिमुख शिक्षण द्या

## डॉ. व्ही. बी. गायकवाड : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय पदवीग्रहण समारंभ



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय पदवीग्रहण समारंभात विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्र आणि त्यांचा सत्कार करताना मान्यवर.

राजगुरुनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - शिक्षणसंस्थांनी समाज आणि उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित कौशल्याभिमुख शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी राजगुरुनगर येथे केले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय पदवीग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्ही. बी. गायकवाड बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील होते. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, प्रा.बी.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.एस., बी.सी.ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी डॉ. गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजेत. यासाठी शिक्षण संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावताना विद्यार्थी ग्राहक मानून त्याला सर्वोत्तम गुणवत्ताधारित शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. विद्यार्थ्यांनी पदवी शिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. याकरिता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच दर्जेदार संगणकीय शिक्षण, एखादी परदेशी भाषा, ॲनिमेशन, ट्रॅव्हल टुरिझमसारखे शिक्षण घेतले तर विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याची संधी आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर विद्यापीठांच्या संकेतस्थळाला (वेबसाइट) भेट देऊन वेगवेगळ्या संधींचा शोध घेऊन प्रयत्नशील राहावे.

त्यानंतर संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील म्हणाले, संस्थेच्या वतीने कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देण्यात येणार आहे. यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विभागाच्या वतीने कौशल्याधारित अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना चार भिंतींच्या पलिकडचे शिक्षण मिळावे, यासाठी कार्यानुभवावर आधारित क्षेत्रीय भेटींना प्राधान्य देण्यात येणार आहे. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी हर्षद वाडेकर याचा महाराष्ट्र शासनाच्या वेटलिफ्टिंगमधील सर्वोत्तम खेळाडू म्हणून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. प्राणीशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला. विद्यापीठ मधुरा चाप आणि मुक्ता अरकेरी या विद्यार्थिनींनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा.नीता डोंगरे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी केले, तर उपप्राचार्य व परीक्षाधिकारी प्रा.बी.डी.कुलकर्णी यांनी आभार मानले.

११ पुढारी | पुणे, शनिवार १० मार्च २०१८

# राजगुरू महाविद्यालयात पदवीदान समारंभ

राजगुरुनगर : प्रतिनिधी

राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ शुक्रवारी (दि. ९) पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील होते. संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम. जरे, प्रा.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी, असे डॉ. गायकवाड म्हणाले.

माजी विद्यार्थी हर्षद वाळेकर याचा महाराष्ट्र शासनाचा नेटबॉलिंटनमध्ये सर्वोत्तम खेळाडू



राजगुरू महाविद्यालयात पदवीदान समारंभात मार्गदर्शन करताना मान्यवर.

म्हणून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल तर प्राणीशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा.नीता डोंगरे यांनी केले. प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले तर उपप्राचार्य व्ही.डी.कुलकर्णी यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, रविवार, दि. ११ मार्च २०१८ २

# कौशल्याभिमुख शिक्षणाची आवश्यकता : गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : अनेक शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगांची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.



प्राणिशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करताना डॉ. व्ही. बी. गायकवाड, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील व मान्यवर.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तृतीय पदवीप्रदान समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

यावेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी. सी. एस., बी. सी. ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४० विद्यार्थी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. याकरिता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात, असे ते म्हणाले.

सकाळ
पुणे, सोमवार
१२ मार्च २०१८
४

# कौशल्याभिमुख शिक्षणाची गरज : गायकवाड

राजगुरुनगर, ता. ११ : आजच्या समाजाची व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित पदवीप्रदान समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित पदवीप्रदान समारंभात विद्यार्थिनीला पदवी प्रमाणपत्र देताना मान्यवर.

ते म्हणाले, "शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी येणाऱ्या सेवा देता आल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच दर्जेदार संगणकीय शिक्षण, एखादी परदेशी भाषा, ॲनिमेशन, ट्रॅव्हल टुरिझमसारखे शिक्षण घेतले, तरच विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याची संधी आहे."

यापुढे महाविद्यालयात कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देण्यात येणार असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विभागाच्या वतीने कौशल्याधारित अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे ॲड. बुट्टे पाटील यांनी सांगितले.

महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी हर्षद वाडेकर याचा महाराष्ट्र शासनाच्या वेटलिफ्टिंगमध्ये सर्वोत्तम खेळाडू म्हणून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. [illegible] विद्यापीठात प्रथम क्रमांकाबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला. प्राचार्य एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नेहा ढोरे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. कुलकर्णी यांनी आभार मानले.

केसरी पुणे, १३ मार्च २०१८ ३

# तंत्रज्ञानाधारित व कौशल्यपूर्ण शिक्षणाची गरज : डॉ. व्ही. बी.गायकवाड

राजगुरुनगर, (वार्ताहर) : अनेक शिक्षणसंस्था ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करीत असल्या तरी समाज व उद्योगाची गरज ओळखून तंत्रज्ञानाधारित व कौशल्याभिमुख शिक्षणाची खऱ्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तृतीय पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एन. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.एस., बी.सी.ए. या शाखांतील पदवीग्रहण करणारे १४५ विद्यार्थी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर बौद्धिक शिक्षणाला सामाजिक, आर्थिक जोड द्यायला हवी. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या सेवा देता आल्या पाहिजे. यासाठी शिक्षणसंस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावताना विद्यार्थी ग्राहक मानून त्याला सर्वोत्तम गुणवत्ताधारित शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. विद्यार्थ्यांनी पदवीशिक्षण हे पाया मानून ध्येयवादी वृत्तीने, नियोजनबद्धपणे आपल्या करिअरला दिशा द्यायला हवी. या करीता विद्यार्थ्यांनी मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा शोधायला हव्यात. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच दर्जेदार संगणकीय शिक्षण, एखादी परदेशी भाषा, ॲनिमेशन, ट्रॅव्हल टुरिझमसारखे शिक्षण घेतले तरच विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याची संधी आहे, असेही ते म्हणाले.



येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात पदवीदान समारंभात पदवीग्रहण समारंभात विद्यार्थ्यांचा सन्मान करताना डॉ. व्ही. बी. गायकवाड व इतर.

महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी हर्षद वाडेकर याचा महाराष्ट्र शासनाच्या वेटलिफ्टिंगमध्ये सर्वोत्तम खेळाडू म्हणून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. प्राणीशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल प्रियंका मुळे या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला. विद्यापीठगीत मधुरा वाघ व सुवर्णा अरकेरी या विद्यार्थिनींनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीता डोंगरे यांनी तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी तसेच आभार उपप्राचार्य व परीक्षाधिकारी प्रा.व्ही. डी. कुलकर्णी यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख